# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.01.2025** **वारःसोमवार**

---

1. नववर्षाच्या पहिल्याच मन की बातमध्ये पंतप्रधानांकडून स्टार्टअप परिसंस्थेचे कौतुक, नागालँडमध्ये स्टार्टअप नोंदणीत वाढ.
2. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या 20वा स्थापना दिवसानिमित्त, कर्मचाऱ्यांच्या धाडस, समर्पण, निस्वार्थ सेवेचं पंतप्रधानांकडून कौतुक.
3. इस्रायल आणि हमास यांच्यातील गाझा युद्धबंदी आणि ओलिसांच्या सुटका कराराची अंमलबजावणी
4. अमेरिकेत डोनल्ड ट्रम्प यांचा आज राष्ट्रध्यक्षपदाचा शपथविधी.
5. जम्मूकाश्मिरच्या उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे साखळीच्या कटरा बडगाम विभागाची अंतिम चाचणी पूर्ण आणि
6. पहिल्याच खो-खो विश्वकरंडकात भारतानं रचला इतिहास, महिला आणि पुरूष संघानी करंडकावर कोरलं नाव.

**<u>मकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंतराळ संशोधनातील भारताच्या ऐतिहासिक कामगिरी आणि आधुनिक अंतराळ तंत्रज्ञानातील प्रगतीचे कौतुक केले आहे. भारतातल्या बुद्धीमान शास्त्रज्ञांच्या नाविन्यपूर्ण दृष्टीकोनामुळे अंतराळ तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवीन मापदंड प्रस्थापित करत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमाच्या 118 व्या भागात, अवकाशात उपग्रहांच्या डॉकिंगमध्ये मिळालेल्या यशाविषयी समाधान व्यक्त करत अंतराळ केंद्रांना साहित्य पुरवण्यासाठी आणि प्रवाशांना अवकाशात पाठवण्यासाठी हे तंत्रज्ञान महत्त्वाचे असल्याचं सांगितलं.

नागालँडमध्ये स्टार्टअप नोंदणीमध्ये दोनशे टक्के वाढ झाल्याचे नमूद करून पंतप्रधानांनी देशातील भरभराटीच्या स्टार्टअप परिसंस्थेचे कौतुक केले. स्टार्ट-अप इंडिया कार्यक्रमाला नऊ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा कार्यक्रम केवळ महानगरांपुरता मर्यादित नसून त्याचा विस्तार दुसऱ्या, तिसऱ्या टप्प्यातल्या शहरांमध्ये झालेला पहायला मिळतो असंही त्यांनी सांगितलं.

पंतप्रधानांनी 75 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या. तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या योगदानाचे स्मरण करताना 23 जानेवारी रोजी नेताजींची जयंतीदिनी पराक्रम दिवस साजरा करत असल्याची आठवण करून दिली.

**<u>आपत्ती-दल</u>**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने आपला 20 वा स्थापना दिन काल साजरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या स्थापना दिनानिमित्त दलाच्या शूर कर्मचाऱ्यांचा गौरव केला. मोदी यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, एनडीआरएफ कर्मचाऱ्यांच्या शौर्य धाडस, समर्पण आणि निस्वार्थ सेवेचे कौतुक केले. आपत्ती प्रतिसाद आणि व्यवस्थापनात एनडीआरएफनं जागतिक मानके स्थापित केली असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. आपत्तींचा सामना करताना लोकांचे जीव वाचवण्यासाठी तसंच आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी असलेली एनडीआरएफची अढळ वचनबद्धता कौतुकास्पद असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या 20 व्या स्थापना दिनाच्या समारंभात सहभागी झाले. यावेळी, गृहमंत्र्यांनी कृष्णा जिल्ह्यातील कोंडापालुरु येथे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या- NIDM च्या दक्षिण कॅम्पसचे उद्घाटनही केले. एनडीआरएफचे कौतुक करताना, शाह यांनी एनडीएमएमध्ये बनवलेल्या धोरणांची अंमलबजावणी प्रत्यक्षपणे केल्यामुळे, आपत्ती व्यवस्थापनात देश जागतिक स्तरावर आघाडीवर असल्याचं सांगितलं. विविध देशांमध्ये गेलेल्या एनडीआरएफ पथकांच्या लोकांना मदत करण्याच्या भुमिकेचे त्या देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी कौतुक केल्याचं सांगितलं. गृहमंत्र्यांनी हैदराबादमधील सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमीमध्ये अत्याधुनिक कंपोझिट शूटिंग रेंजची पायाभरणीही केली.

**<u>टपाल विभाग- संविधान 75 वर्षे</u>**

भारतीय संविधानाच्या स्वीकृतीच्या अमृतमहोत्सवानिमित्त टपाल विभाग आज नवी दिल्लीत तीन दिवसांचा कार्यक्रम आयोजित करणार आहे. राष्ट्रीय फिलाटेलिक संग्रहालयात होणाऱ्या या महोत्सवात सर्व वयोगटातील अभ्यागतांसाठी विविध उपक्रम असतील. यामध्ये प्रदर्शन, प्रश्नमंजुषा, पोस्टल सफारी आणि पत्रलेखन स्पर्धा यांचा समावेश आहे. संविधानात नमूद केलेल्या मूल्यांना उजाळा देणे आणि एकता आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना बळकट करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे दळणवळण मंत्रालयाने म्हटले आहे.

**<u>जागतिक आर्थिक मंच</u>**

जागतिक आर्थिक मंचाची 55 वी वार्षिक बैठक आज स्वित्झर्लंडमधील दावोस येथे सुरू होत आहे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात समावेशक विकास आणि डिजिटल क्रांतीच्या भारतीय मॉडेलविषयी विशेष चर्चा केली जाईल. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू हे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्यासह भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील. भारताच्या प्रभावी आर्थिक विकास दराने, प्रमुख क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय विकासासह, संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे आणि देशाला जागतिक स्तरावर एक अग्रगण्य स्थान मिळाल्याचं वृत्त आकाशवाणीच्या प्रतिनिधीने दिलं आहे.

**<u>युद्धबंदी</u>**

इस्रायल आणि हमास यांच्यातील गाझा युद्धबंदी आणि ओलिसांच्या सुटकेचा करार कालपासून अंमलात आला आहे. नियोजित वेळेपेक्षा वाटाघाटी तीन तास उशिरा सुरू झाल्या. या प्रदेशात सुरू असलेला हिंसाचार कमी दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. मध्यस्थ कतारने युद्धबंदी सुरू झाल्याची पुष्टी केली आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, करारानुसार सोडण्यात येणाऱ्या कैद्यांची यादी त्यांना मिळाली आहे. तर येत्या सात दिवसांत इतर चार महिला कैद्यांना सोडण्यात येईल असं इस्रायली पंतप्रधान कार्यालयाने म्हटले आहे.

**<u>ट्रम्प-शपथ</u>**

डोनाल्ड जॉन ट्रम्प आज राजधानी वॉशिंग्टन डीसी येथे अमेरिकेचे 47 वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतील. उणे 6 अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान आणि प्रतिकूल हवामानामुळे, शपथविधी समारंभ यूएस कॅपिटल इमारतीच्या रोटुंडा इथं भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता होईल. शपथविधी सोहळ्याला राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि जिल बायडेन, माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन आणि हिलरी क्लिंटन, माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश आणि लॉरा बुश आणि माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा उपस्थित राहतील. परंपरेला छेद देत, अनेक परदेशी नेते या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**<u>मांडवीय-अनौपचारिक क्षेत्र</u>**

केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय आज नवी दिल्ली येथे अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करतील. संबंधित भागधारकांना अनौपचारिक

क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यास सक्षम करणं हा परिषदेचा प्राथमिक उद्देश आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना औपचारिक सुविधा आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याबाबत सुमारे 150 हून अधिक सहभागी परिषदेत आपले विचार मांडतील.

**महाकुंभ**

प्रयागराज इथल्या महाकुंभमुळे देशभरातल्या कारागीरांना सुवर्णसंधी प्रदान झाली आहे. इथल्या संगमांवर एक जिल्हा एक उत्पादन संकल्पनेवरील भव्य प्रदर्शन, सहा हजार चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारण्यात आल्याची माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीने दिली आहे. फिरोजाबादमधील कार्पेट, जरी उत्पादने, काचेची खेळणी, वाराणसीतील लाकडी खेळण्यांचे उत्पादने भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र बनत आहेत. आकाशवाणीशी बोलताना, प्रयागराज विभागाचे सहआयुक्त उद्योग शरद टंडन यांनी प्रदर्शनात विविध उत्पादने प्रदर्शित करणारे सुमारे 140 स्टॉल उभारण्यात आल्याची माहिती दिली.

दरम्यान, प्रयागराजमधील महाकुंभ मेळा परिसरातील सेक्टर 19 मध्ये काल संध्याकाळी आग लागली, ती तत्काळ आटोक्यात आणण्यात आली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन सेवा, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकांनी घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबाबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी फोनवरून चर्चा केली आहे.

**जम्मू-काश्मीर-चाचणी धाव**

जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंकच्या कटरा-बडगाम विभागाची अंतिम चाचणी काल पूर्ण झाली. कटरा रेल्वे स्थानकावरून सकाळी 8 वाजता 18 डब्यांची चाचणी रेल्वेगाडी काश्मीरसाठी रवाना झाली. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला हा रेल्वे जोडमार्ग 41 हजार कोटी रुपये पूर्ण करण्यात आला. 326 किलोमीटर लांबीच्या कटरा ते बडगाम मार्गापैकी 111 किलोमीटरचा मार्ग बोगद्यांमधून जातो. भारतीय रेल्वेने जगातील सर्वात उंच रेल्वे पूल रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर बांधला आहे. एक हजार तीनशे 15 मीटर लांबीचा हा पूल नदीपात्रापासून तीनशे 59 मीटर उंचीवर बांधला आहे. सांगलदान रेल्वे स्टेशन आणि रियासी रेल्वे स्टेशन दरम्यान हा पूल बांधला आहे. भारतीय रेल्वेने अंजिखर नदीवर पहिला केबल-स्टेड पूल देखील बांधला आहे. या प्रकल्पामुळे फलोत्पादन, शेती, पर्यटन, व्यापार आणि शिक्षणाला चालना मिळेल. काश्मीर आणि उर्वरित भारतामधील प्रवास सामान्य लोकांसाठी सोपा आणि स्वस्त होईल.

**खो खो-जागतिक कप**

पहिल्याच खो खो विश्वचषकात भारतीय संघाने पुरुष आणि महिला दोन्ही गटात विजेतेपद जिंकून काल इतिहास रचला. इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेत भारतीय संघांनी उत्तम गती, रणनीती आणि कौशल्य दाखवून चषक जिंकला. भारतीय पुरुष संघाने नेपाळविरुद्धचा अंतिम सामना 54-36 असा दमदार विजय मिळवला. तत्पूर्वी, भारतीय महिला संघाने त्यांच्या अंतिम सामन्यात नेपाळचा 78-40 असा पराभव केला.

खो खो विश्वचषकाच्या पहिल्या अंतिम सामन्यात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, माजी लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन आणि ओडिशाचे क्रीडा मंत्री सूर्यवंशी सूरज यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुरूष संघाचा कर्णधार प्रतीक वायकरने कर्णधार म्हणून हा एक अभिमानास्पद आणि अविस्मरणीय क्षण असून क्रीडाप्रेमींच्या पाठिंब्याबद्दल संघ आभारी असल्याचं म्हटलं आहे. तर महिला संघाचा हा विजय खेळाडू आणि प्रशिक्षक दोघांच्याही कठोर परिश्रम आणि समर्पणाचा परिपाक असल्याची प्रतिक्रिया संघाची कर्णधार प्रियांका इंगळे हिने दिली.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.